# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्र.
०२०–२५६०१३५३
ई–मेल
iqac@unipune.ac.in

गणेशखिंड, पुणे ४११००७
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष

संदर्भ क्र.:आयक्यूएसी/ 632

दि:– १५ नोव्हेंबर, २०१९

**अत्यंत महत्वाचे**

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,
संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/विद्यापीठ शैक्षणिक विभाग
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

**विषय – 'अविष्कार' राज्यस्तरीय संशोधन स्पर्धा २०१९ साठी ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यात येणा–या संशोधन संकल्पनांच्या मुदतवाढीबाबत.**

**संदर्भ – अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्षाचे परिपत्रक क्र.२६३/२०१९ दि. १५/१०/२०१९.**

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने 'अविष्कार' राज्यस्तरीय संशोधन स्पर्धा २०१९ साठी ऑनलाईन पध्दतीने संशोधन संकल्पना सादर करण्यासाठी avishkar.unipune.ac.in हे संकेतस्थळ विकसित केलेले असून याअंतर्गत विद्यापीठ संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/विद्यापीठ शैक्षणिक विभागातील विद्यार्थ्यांना संशोधन विषयक संकल्पना सादर करण्यासाठी दिनांक १५ नोव्हेंबर, २०१९ पर्यंत मुदत देण्यात आलेली होती.

अविष्कार राज्यस्तरीय संशोधन स्पर्धेमध्ये विद्यापीठाची यशस्वी परंपरा आहे. सदर स्पर्धेमध्ये सहभागी विद्यार्थ्यांचा वाढता प्रतिसाद विचारात घेता, अविष्कार पोर्टल अंतर्गत संशोधन संकल्पना ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यासाठी शुक्रवार, दिनांक २२ नोव्हेंबर, २०१९ रोजी सांयकाळी ६.०० वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

15/11/19

(मुं.वि.रासवे)
उपकुलसचिव
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष
(अतिरिक्त कार्यभार)